**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ८ डिसेंबर, २०१६
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

तारांकित प्रश्न.

**दोन : शोक प्रस्ताव -**

सर्वश्री भास्करराव शिवराम चालुक्य व कैलास रामराव पाटील-चिकटगावकर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **वने मंत्री** : महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे दिनांक १ जुलै, २००९ ते ३० जून, २०१० व १ जुलै, २०१० ते ३० जून, २०११ या कालावधीचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **जलसंपदा मंत्री** :

(क) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा सतरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **पणन मंत्री** : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल कार्यालयाचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल (S.A.R.) सभागृहासमोर ठेवतील.

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(बुधवार, दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. १ ते ३)**

(१) **सर्वश्री मनोहर भोईर, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, किसन कथोरे, राणाजगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, सर्वश्री.चंद्रदीप नरके, शरद सोनवणे, शिवाजीराव नाईक, सुरेश लाड, भास्कर जाधव, सदा सरवणकर, सुनिल प्रभू, प्रकाश सुर्वे, सत्यजित पाटील, कुणाल पाटील, संग्राम थोपटे, अमित झनक, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. नारायण पाटील, राजाभाऊ वाजे, गणपत गायकवाड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री प्रकाश आबिटकर, उल्हास पाटील, किशोर पाटील वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने ऑनलाईनद्वारे सातबारा उतारे देण्याची केलेली घोषणा, परंतु ऑनलाईन सातबारा आणि ई फेरफारसाठी आवश्यक असलेली यंत्रणा कुचकामी ठरत असल्यामुळे गत सहा महिन्याच्या कालावधीत तिसऱ्यांदा तलाठयांनी केलेले आंदोलन, हस्तलिखित सातबारा उतारा देण्याचे शासनाने बंद केल्यामुळे तसेच सॉफ्टवेअर मधील वर्कस्टेशन अद्ययावत नसणे, कनेक्टीवीटी नसणे, इत्यादी ४२ प्रकारच्या अडचणी NIC, पुणे यांना कळवूनही त्या अद्यापही सोडविण्यात न आल्यामुळे तलाठी, मंडळ अधिकारी व शेतकरी अडचणीत येणे, या संदर्भात तत्कालीन महसूल मंत्री यांच्यासोबत झालेल्या

बैठकीत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी सज्जांची निर्मिती करण्याचे आश्वासन देऊनही त्याची न झालेली अंमलबजावणी, परिणामी तलाठी, मंडळ अधिकारी व शेतकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, शासनाने या तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्यासाठी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषि मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने कृषी विभागाच्या संशोधन व विस्तार कार्याशी निगडीत असणाऱ्या २६ योजना बंद करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास येणे, राज्य व जिल्हा पातळीवर समान असणाऱ्या योजना रद्द करुन त्या अन्य कृषी योजनांमध्ये समाविष्ट करुन योजना कमी करण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले असले तरी त्याबाबतची शासनाची असलेली संदिग्ध भूमिका, केंद्र शासनाने या अगोदरच राज्याला विविध कृषी योजनातंर्गत दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये १३ हजार कोटी रुपयांची करण्यात आलेली कपात, नॅशनल हॉर्टीकल्चर मिशन (एनएचएम) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभासाठीच्या योजना अपुऱ्या निधीअभावी बंद करणे, त्याप्रकारे राज्य शासनानेही कृषी विकासाच्या योजना बंद करण्याची स्वीकारलेली भूमिका, कृषी संशोधन व विस्तार हा कृषी विकासाचा मुख्य पाया असताना, त्याद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजना या कृषी विकासाला बळकटी देणाऱ्या असल्याने त्याद्वारे कृषी क्षेत्रामध्ये घडून येणाऱ्या शाश्वत प्रगतीला या योजना बंद केल्यामुळे बसणारी खीळ, परिणामी कृषी क्षेत्राचे होणारे नुकसान, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर येथील प्रादेशीक मनोरूग्णालयात २० मनोरूग्णांचा मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, मनोरूग्णालय प्रशासनाकडून रूग्णांना योग्य उपचार न मिळणे, रुग्णांचे हातपाय बांधून सामान्य रूग्णांच्या कक्षामध्ये मनोरूग्णांना ठेवण्यात येणे, अत्यावश्यक औषधांचा असलेला तुटवडा, रुग्णालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी रूग्णांना करत असलेली मारपीट याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांनी वैद्यकीय अधीक्षक, मनोरूग्णालय, नागपूर यांच्याकडे केलेल्या तक्रारी, मनोरूग्णालयातील श्री. मनोहर आहूजा या रुग्णाचा झालेला संशयास्पद मृत्यू, मृतकाच्या शरीरावर जखमा असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद असणे, मंगळवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी मृत्यू झालेल्या मनोरूग्णाचा

तहसिलदार यांच्या उपस्थितीअभावी गुरूवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी करण्यात आलेले शवविच्छेदन, राज्यातील पूर्व विदर्भात असलेले एकमेव मनोरूग्णालयाची झालेली अत्यंत बिकट अवस्था, याकडे प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, सुरेश लाड, अमीन पटेल, जितेंद्र आव्हाड, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. भास्कर जाधव, जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, संजय कदम, वैभव पिचड, राजेश टोपे, संग्राम जगताप, हनुमंत डोळस, राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अबू आझमी, दिलीप वळसे पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, सुनील केदार, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचे प्रस्ताव :-

(१) "ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, सुरेश लाड, अमीन पटेल, जितेंद्र आव्हाड, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. भास्कर जाधव, जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, संजय कदम, वैभव पिचड, राजेश टोपे, संग्राम जगताप, हनुमंत डोळस, राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अबू आझमी, दिलीप वळसे पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, सुनील केदार, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचे प्रस्ताव :-

(२) "ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २४ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे पाटील, सुनील केदार, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचे प्रस्ताव :-

(३) "ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २७ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे- विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१६.

---

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची

सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(बुधवार, दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **ॲड. आशिष शेलार, श्री. सुनिल प्रभू, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री. सुरेश हाळवणकर, सुभाष साबणे, उन्मेष पाटील, संदिपान भुमरे, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. शंभूराज देसाई, सत्यजित पाटील, सुनिल शिंदे, हेमंत पाटील, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. हर्षवर्धन जाधव, किशोर पाटील, अनिल कदम, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"राज्यामध्ये बहुसंख्येने असणाऱ्या मराठा समाजाची अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी असणे, परंतु या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होणे, मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात स्थगिती मिळणे, उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी पुरावे व सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी मराठा आरक्षण समिती गठीत करणे, राज्यातील अनेक जिल्हयात मराठा समाजाचे प्रचंड शांततापूर्ण, शिस्तबध्द, मूक क्रांती मोर्चे निघणे, प्रस्थापित मराठा नेतृत्वाकडून झालेल्या अन्यायाविरोधातील आपल्या भावना मोर्च्यातून व्यक्त होणे, राज्य शासनाने आर्थिकदृष्टया दुर्बल मागास वर्गाची उत्पन्न मर्यादा ६ लाखापर्यंत वाढविली असणे,तसेच सर्व आर्थिक दुर्बल घटकांसाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व डॉ. पंजाबराव देखमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना सुरु करणे, कोपर्डी प्रकरणातील अत्याचार लक्षात घेता सदर प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून पिडीत महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न करणे, मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने सुरु केलेल्या योजना व त्यावरील जनतेची असणारी प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

नऊ : **सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, अजित पवार,मो.आरिफ नसीम खान,जयंत पाटील,विजय वडेट्टीवार, राजेश टोपे,डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री.शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, गोपालदास अग्रवाल,जितेंद्र आव्हाड, ॲड.के.सी.पाडवी, श्री.अब्दुल सत्तार, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री.अमीन पटेल, नितेश राणे,ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री.डी.पी.सावंत,अमर काळे,भास्कर जाधव, राहुल मोटे,दिलीप सोपल, सुनिल केदार,कालीदास कोळंबकर, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री.बाळासाहेब पाटील, श्रीमती निर्मला गावीत, श्री.जयकुमार गोरे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री.मधुकरराव चव्हाण,वसंतराव चव्हाण,राणा जगजितसिंह पाटील, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री.संग्राम थोपटे, बाळासाहेब थोरात, अमित देशमुख, काशिराम पावरा, कुणाल पाटील, राहुल बोंद्रे, भारत भालके, त्र्यंबक भिसे, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती.प्रणिती शिंदे,**

**सर्वश्री.अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

" राज्यात मराठा, धनगर, मुस्लीम,लिंगायत,कोळी तसेच इतर मागास प्रवर्गाने नोकरी, शैक्षणिक आरक्षण व इतर सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून गेली वर्षभर राज्यभर काढलेले मुक मोर्चे व शांततापूर्ण मार्गाने केलेली आंदोलने, राणे समितीने मराठा समाजाला २० टक्के आरक्षण देण्याची केलेली शिफारस, घटनेनुसार ५० टक्क्याच्या वर आरक्षण देता येत नसले तरी तामिळनाडू राज्याने ६९ टक्के पर्यंत आरक्षणाबाबत केलेले सर्व्हेक्षण सर्वोच्च न्यायालयाने विचारात घेणे, त्या अनुषंगाने न्यायालयात बाजू मांडण्याऐवजी मराठा आरक्षणाबाबत न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात मुदतवाढ मागून शासनाने केलेली चालढकल, निवडणुकीपूर्वी शासनाने मराठा, मुस्लीम व धनगर समाजाला दिलेले आश्वासन पाळण्यात न आल्यामुळे समाजात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्यात मुस्लीम समाजाची आर्थिक स्थिती दयनीय असुन मुस्लीमांचे शासकीय नोकऱ्यांमधील केवळ दीड टक्का असलेले प्रमाण, मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबत याचिका दाखल करण्यात आली असता मुस्लीम मागास जातींना ५ टक्के शैक्षणिक आरक्षण कायम ठेवण्याचे न्यायालयाने दिलेले आदेश, याबाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबतचे आश्वासन देऊन दोन वर्ष होऊनही अद्याप निर्णय प्रलंबित असणे, मराठा, मुस्लीम, धनगर इ. समाजाने शांततेने मुक मोर्चे काढून इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता केलेली आरक्षणाची मागणी करुन घालून दिलेला आदर्श, यासंदर्भात शासनाने दाखविलेली उदासीनता व वेळकाढूपणा, परिणामी मराठा, धनगर, मुस्लीम समाजामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली तथापि, प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना क्रमांक १)**

(१) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"**शासनाने क्रीडा स्पर्धा सरावासाठी खेळाडूंना सवलत देण्याचा घेतलेला निर्णय**" या विषयावरील श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १७७ मधील प्रश्न क्रमांक ३४६८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली तथापि चर्चा न झालेली अर्धा-तास चर्चेची सूचना क्रमांक २)**

(२) **श्री. सुरेश गोरे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"तळेगाव-चाकण-शिक्रापूर-चौफूला राज्यमार्ग क्र. ५५ या अरुंद रस्त्यावरुन चाकण व रांजणगाव औद्योगिक क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे होत असलेली वाहतूक कोंडी व अपघात, सदर अरुंद मार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम बांधा-वापरा-हस्तांतरित करा तत्वावर देण्यात येणे, तथापि, सदर चौपदरीकरणासाठी भूसंपादनाचे काम संथ गतीने सुरु असल्याने चौपदरीकरण करण्याचे काम पूर्ण होण्यास होत असलेला विलंब, परिणामी प्रकल्पाच्या मूळ किंमतीत वाढ होऊन शासनाचे होणारे आर्थिक नुकसान, त्यामुळे सदर काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना क्रमांक ३ व ४)**

(३) **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शहरी भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत नळजोडण्या असून कर किंवा पाणीपट्टी न भरता यातून पाणी वापरले जाणे, मुंबई शहर व उपनगरातील काही भागांमध्ये महापालिकेच्या पाईपलाईनमधून सर्रासपणे पाण्याची चोरी सुरु असून हे टँकर माफिया स्थानिक प्रभाग अधिकाऱ्यांशी अर्थपूर्ण व्यवहार करीत असणे, यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा मोठ्या प्रमाणात बुडत असलेला महसूल, अनधिकृत नळजोडण्या व पाणी चोरी यामुळे पाणीपट्टी भरणा-या नागरिकांना पाणी टंचाई सारख्या समस्येला सामोरे जावे लागणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.संजय पोतनीस, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सांताक्रूझ, मुंबई येथे सन १९४० मध्ये बांधलेल्या पोलीस वसाहतीमधील सहा इमारती असून त्यांची झालेली दयनीय अवस्था, या इमारती जुन्या झाल्याने जागोजागी भेगा पडलेल्या असून इमारती कोसळण्याच्या स्थितीत असणे, जीर्ण झालेली पाण्याची टाकी व सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्याने मोठया प्रमाणात साथीचे आजार पसरणे,

इमारतीच्या अवस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तकारी करूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, परिणामी पोलिस व त्यांच्या कुटुंबियांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, त्यामुळे सदर इमारतींची पाहणी करुन त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ७ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.